राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अतिरिक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश करणे व पात्रतेच्या अटीत सुधारणा करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २१ जून, २०१७

**संदर्भ:**

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/ प्र.क्र.२१९/तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक ईबीसी-२०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१/०३/२०१६

३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.३२५/तांशि-४, दिनांक २०/०७/२०१६

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६

५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५/०४/२०१७

**प्रस्तावना :**

सध्या राज्यात “राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” अंतर्गत वरील संदर्भ क्रमांक ४येथील शासन निर्णयान्वये शासकीय, शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने मध्ये (खाजगी विनाअनुदानित अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) खालील निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विदयार्थ्यांकडून आकारण्यात येणा-या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यन्तचे शिक्षण शुल्क शासनाकडून शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येते. सदर योजनेंतर्गत ज्या विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांना संबंधित प्रशासकीय विभागाकडून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते ते अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नांव | अभ्यासक्रम |
| --- | --- | --- |
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | **पदविका:** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी<br>**पदवी:** अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग<br>टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र.<br>**पदव्युत्तर पदवी:** मास्टर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट / मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मास्टर ऑफ कंम्प्युटर अप्लिकेशन |
| २ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | **पदवी:**एम.बी.बी.एस., बी.डी.एस., बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., बी.यु.एम.एस., बी.पी.टी.एच., बी.ओ.टी.एच. व नर्सिंग |
| ३ | कृषी विभाग | **पदविका :**कृषी<br>**पदवी :** फलोत्पादन, जैव तंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, शेती व्यवस्थापन |
| ४ | पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग | **पदविका :** दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, पशुसंवर्धन व्यवस्थापन.<br>**पदवी:** प्राणिशास्त्र व पशुसंवर्धन, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्यविज्ञान<br>**पदव्युत्तर पदवी:** प्राणिशास्त्र |

२. तसेच शासकीय व अनुदानित कला व वाणिज्य महाविदयालयांमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विदयार्थ्यांसाठी देखिल स्वतंत्रपणे शिष्यवृत्ती योजना संचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत राबविण्यात येत आहे.

३. तसेच "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती" योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांचे त्यांच्या प्रवेशित महाविद्यालय / तंत्रनिकेतनांकरिता शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरणाने / शासनाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शुल्क हे सध्या संबंधित शैक्षणिक संस्थेस शासनाकडून शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येते.

४. तसेच वरील संदर्भ क्र. २ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांव्यतिरिक्त कृषी विभागाच्या अखत्यारितील कृषी व संलग्न विषयाच्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा ज्याप्रमाणे शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीकरिता समावेश केला आहे, त्याचधर्तीवर आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी कृषी व संलग्न महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी उपरोक्त योजनेत कृषी व संलग्न विषयातील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा समावेश करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

५. तसेच सध्या शासनाकडून वरील संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असलेल्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत अंमलबजावणीच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन त्यासंदर्भात स्पष्टता येण्यासाठी अटी / शर्ती नमूद करण्याचे प्रस्तावित होते.

६. उपरोक्त बाबी विचारात घेऊन विभागाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मंत्रिमंडळाने दिनांक २०/६/२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सदरचा शासन निर्णय पुढीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय:

प्रचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या निवडक अभ्यासक्रमाच्या यादीत कृषी विभागाच्या अखत्यारितील कृषी व सलग्न विषयाच्या पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा समावेश करण्यास व या अभ्यासक्रमांसाठी शासकीय, शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयात (खाजगी अभिमत विद्यापीठ / स्वयंसहाय्यित विद्यापीठ वगळून) सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येईल.

२. याशिवाय राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वरील संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयात नमूद केलेल्या अटीतील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील "दिव्यांग" विद्यार्थ्यांसाठी पात्रतेकरीता अनुक्रमे इयत्ता १० वी / इयत्ता १२ वी मध्ये एकूण ६० टक्के गुणांची अट शिथिल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. तसेच वरील संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयामध्ये "थेट व्दितीय वर्षात" निवडक व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्या दुर्बल घटकातील पदविकाधारक विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १० वी च्या परीक्षेला ६० टक्के गुणांची अट नमूद केली आहे. त्या ऐवजी संबंधित पदविका अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत एकूण ५० टक्के गुण किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणे आवश्यक असेल अशी सुधारणा प्रचलित अटीमध्ये करण्यात येत आहे.

४. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेतील अटीप्रमाणे डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्यांस खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक असेल :-

अ) लाभार्थी विद्यार्थ्यांनी नियमितपणे महाविद्यालय / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहिल व प्रत्येक सत्रात अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल. केवळ विशिष्ट परिस्थतीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधित उपसंचालक / सहसंचालक वा सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहिल.

ब) पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर विद्यार्थी या योजनेचा लाभ मिळण्यास अपात्र राहिल.

तथापि, तद्‌नंतर पुनश्च: त्या सत्र / वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेच्या लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

क) परंतु असे पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्या पेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरिता कायम स्वरुपी अपात्र ठरेल

ड) शासनाने वरील संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये विहित केल्याप्रमाणे आधारसंलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीमध्ये किमान ५० टक्के शैक्षणिक उपस्थिती आवश्यक असेल. तसेच सदर योजनेंतर्गत जे विद्यार्थी शासकीय / अशासकीय वसतिगृहात अथवा भाडेतत्वावर शैक्षणिक प्रयोजनार्थ वास्तव्य करीत असल्यास त्या पात्र लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र असतील.

५. **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क** शिष्यवृत्ती **योजना"** व **"डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना"** या योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल.

६. वरीलप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती ही सुलभरित्या व तात्काळ अदा करुन योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम,२०१६ मधील तरतुदीनुसार पात्र लाभार्थ्यांना थेट त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात येईल.

७. वरील बदल वगळता संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये निर्धारित केलेली अंमलबजावणीची उर्वरित सर्व कार्य पध्दती कायम राहतील व त्यानुसार पात्र लाभार्थ्यांनी त्यांच्या आधार क्रमांकाबरोबरच आधार संलग्नित बचत खात्याचा तपशिल हा ऑन-लाईन अर्जासोबत देणे आवश्यक असेल व उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयात नमूद केलेल्या विहित पध्दतीनुसार संबंधित शैक्षणिक संस्थेने व सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्राप्त अर्जाची छाननीची प्रक्रिया अवलंबणे आवश्यक असेल. तसेच संबंधित विद्यार्थ्यांची महाविद्यालय / तंत्रनिकेतनामध्ये आधार संलग्नित बायोमॅट्रीक प्रणालीवरील किमान ५० टक्के इतकी उपस्थिती नोंदविल्याची व सदर विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेला बसल्याची खात्री करण्यात यावी.

८. उपरोक्त सर्व अटी व शर्ती शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून प्रथम / थेट द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांना लागू राहतील.

९. या योजनांतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती / निर्वाह भत्ता अदा केल्यानंतर दरवर्षी अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची त्याचा अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी ही अंमलबजावणी करणा-या विभागाच्या अखत्यारितील संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

१०. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे पारदर्शी पध्दतीने काटेकोररित्या अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री (संगणक/प्रिंटर, फर्निचर इत्यादी ) खाजगी सेवा परिरक्षण, स्टेशनरी, न्यायालयीन प्रकरणे यासारख्या विविध बाबींकरिता येणारा प्रशासकीय खर्च भागविण्याकरिता तंत्र शिक्षण संचालनालयास प्रतिवर्षी विद्यार्थ्यांना अदा करण्यात येणाऱ्या एकूण खर्चाच्या ०.५ टक्के इतका निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११. सदरचा शासन निर्णयास अनुसरुन कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभागाने त्यांच्या विभागांतर्गत आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता आवश्यक ते पूरक आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

१२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक, २६९/१७/व्यय-५, दिनांक ०८.०३.२०१७ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०६२११४०५२८०७०८ असा आहे. सदरचे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( डॉ. किरण पाटील )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
७. सचिव (प.दु.म.), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सामाजिक न्याय व विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
११. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे,
१२. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक
१३. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१४. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१५. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१६. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१९. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
२४. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२६. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२७. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२९. सर्व जिल्हाधिकारी
३०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३१. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३५. मा. विरोधी पक्ष नेता, ( विधान परिषद ), यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
३६. मा. विरोधी पक्ष नेता, (विधानसभा ), यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई,
३७. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
३८. उप सचिव (मशि/विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३९. अवर सचिव (तांशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४०. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/ तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४१. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
४२. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
४३. निवडनस्ती/तांशि-४.